जन संपर्क अधिकारी कार्यालय, ठाणे शहर पोलीस

P.R.O. OFFICE, CRIME BRANCH, THANE CITY

Address- Office of Commissioner of Police, Thane City,
Near Kalwa Bridge, Thane West Maharashtra -400601
Email Id- cp.thane.pro@mahapolice.gov.in Contact No: +919819208279

प्रेस नोट क्रमांक - **दिनांक - १८/०५/२०२३**

गुन्हे शाखा, घटक-१, ठाणे ची कामगिरी

‘‘ २० दिवसाचे बालकास नाशिक येथुन उल्हासनगर जि. ठाणे येथे विक्रीसाठी घेवुन आलेल्या आईसह, नर्सींग होम चालविणारे महिला डॉक्टर व आंतरराज्यातील एजंटसह ०५ सदस्यांची टोळीस अटक, ’’

———————————oooooooooo———————————

गुन्हे शाखा घटक १ ठाणे येथे सुमारे ०२ महिन्यापुर्वी माहिती मिळाली होती की, ‘‘ कवाराम चौक, उल्हासनगर नंबर ३, जि. ठाणे येथील महालक्ष्मी नर्सींग होममधील महिला डॉक्टर नामे चित्रा चैनानी हया लहान मुलांची विक्री करीत असल्याची माहिती मिळाली होती. त्याकरीता बनावट ग्राहक म्हणुन महिला नामे सौ. अनिता कंगारे यांना तयार करुन त्यांचेमार्फत महिला डॉ. चित्रा यांना संपर्क केला होता. त्यानंतर सातत्याने ०२ महिने सदरबाबत सातत्याने पाठवपुरावा सुरू होता. दिनांक १७/०५/२०२३ रोजी सकाळी १०.०० वा. सुमारास सदर महिला डॉ. चित्रा यांनी बनावट ग्राहक नामे अनिता कंगारे यांना फोन करुन तिच्याकडे २० दिवसाचा मुलगा विक्री करणेकामी आले आहे. त्याकामी तिने ७,००,०००/- रू. मागणी केली असुन सदर मुलास पाहुन घ्या व पैसे घेवुन या असे सांगीतले.

प्राप्त माहिती लागलीच मा. वरिष्ठांना देण्यात आली, मा. वरिष्ठांच्या सुचना, मार्गदर्शन व आदेशान्वये गुन्हे शाखा, घटक १, ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. दिलीप पाटील यांनी एक विशेष पथक स्थापन केले. सदर पथकाने लागलीच कारवाई करत आरोपी नामे १) डॉ. चित्रा जयप्रकाश चैनानी, वय ६१ वर्षे, धंदा डॉक्टर, रा. ठि. - उल्हासनगर, नंबर २, ठाणे, **(एजंट/ महिला डॉक्टर)** २) सौ. प्रतिभा राहुल मगरे, वय ३० वर्षे, रा. पंचशिल नगर, सुभाष टेकडी, उल्हासनगर ४, जि. ठाणे, **(एजंट)** ३) सौ. संगीता सुरेश वाघ, वय ४८वर्षे, धंदा गृहीणी, रा. पंचवटी, नाशिक, ४) **(बालकाची आई)** सौ. गंगादेवी चुट्टन योगी, वय २५ वर्षे, धंदा गृहीणी, रा. पंचवटी, नाशिक, **(बालकाचे वय २० दिवस)** ५) श्री. देवन्ना होनप्पा कमरेकर, वय ५५ वर्षे, धंदा नोकरी, रा. जी. आय. टी. कॉलेज रोड, फस्ट क्रॉस राजाराम नगर अे, उद्म्मबाग, बेळगांव, कर्नाटक **(एजंट)** यांना ताब्यात घेण्यात आले असुन सदर त्यांच्याविरूद्ध मध्यवर्ती पोलीस ठाणे, उल्हासनगर येथे गुन्हा नोंद क्रमांक ३२८/२०२३ भारतीय दंड संहीता कलम ३७०, ३४ सह बाल न्याय (बालकांची काळजी आणि संरक्षण) कायदा सन २०१५ चे कलम ८०, ८१ प्रमाणे गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा तपास मध्यवर्ती पोलीस ठाण्यामार्फत करण्यात येत आहे. ताब्यात घेतलेले २० दिवसाचे बालकास जननी आशिष चारीटेबल ट्रस्ट, डोंबिवली येथे ठेवण्यात आले आहे.

सदरची कामगिरी मा. वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, घटक - १, ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. दिलीप पाटील, पोनि/ कृष्णा कोकणी, सपोनि/ योगेश काकड, पोहवा/ अमोल देसाई, पोहवा/ नंदकुमार पाटील, पोहवा/ दिपक जाधव, पोहवा/ विश्वास मोटे, मपोना/तेजश्री शेळके, पोशि/ सागर सुरळकर सर्व नेमणुक गुन्हे शाखा घटक १, ठाणे यांनी केली आहे.

--------ooooo---------